upload New & Binding

EAU/ICD/2019-20/69
10/5/2019

②

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र./२०१९-२०

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१९-२० मधील २६ एप्रिल, २०१९ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०१९-२० मधील दुसरी बैठक मंगळवार दिनांक २६ एप्रिल, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४. | डॉ. रश्मी ओझा | सदस्य |
| ५. | प्रा. (डॉ.) अजय भामरे | सदस्य |
| ६. | डॉ. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ७. | प्रा. डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ८. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| ९. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १०. | प्रा. बि. एन. जगताप | सदस्य |
| ११. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १२. | डॉ. अजय देशमुख (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १३. | डॉ. विनोद पाटील (संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १४. | श्री. संजय शाह (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **अनुपस्थिती :-**

प्रा.(डॉ) मुरलीधर कुऱ्हाडे, डॉ. रविकांत बा. सांगुर्डे, डॉ. सुभाष वाघमारे यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांना अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

SKS

➢ **स्वागत**

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा. अध्यक्षांना सभेचे कामकाज सुरू करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली. मा. अध्यक्षांनी देखील उपस्थित सर्वांचे स्वागत करून सभेची कार्यवाही सुरू करण्यास अनुमती प्रदान केली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब |
|---|---|
| | **(कार्यकारी प्राधिकरणे विभाग)** |
| **बाब क्र.१** | **दिनांक २ जानेवारी, २०१९, २९ जानेवारी, २०१९, (६ फेब्रुवारी, २०१९, १६ फेब्रुवारी, २०१९) व २३ फेब्रुवारी, २०१९, रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.** |
| **ठराव** | सदर बाब विषय पत्रिकेवरुन मागे घेण्याबाबत सदस्य सचिवांनी विनंती केली असता त्यास व्यवस्थापन परिषेदने मान्यता प्रदान केली व ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करण्याबाबत सुचित केले. |
| | **(कार्यकारी प्राधिकरणे विभाग)** |
| **बाब क्र.२** | **दिनांक १० सप्टेंबर, २०१८ व ६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवाल.** |
| **ठराव** | सदर बाब विषय पत्रिकेवरुन मागे घेण्यात आली. सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावी असे निर्देश व्यवस्थापन परिषदेने दिले. |
| | **( संलग्नता व मान्यता विभाग )** |
| **बाब क्र.३** | **Request of the Director, Bombay Teachers' Training College vide letter No. Bttc/Aff/2018/66 dated 28th June, 2018 to change the name of the college from "Bombay Teachers' Training College" to "Dr. Navin Hiranandani College of Education & Research" for consideration.** |
| **ठराव** | **संलग्नता विभागाने बॉम्बे टिचर्स ट्रेनिंग महाविद्यालयाची बाबी सोबत महाविद्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे विद्यापीठाचे शुल्क प्रलंबित नसल्याचे प्रमाणपत्र तसेच महाविद्यालयात प्राचार्य पद नियमित अथवा तात्पुरते भरले असल्यास किंवा महाविद्यालयाने प्राचार्य पद भरण्याकरिता केलेले प्रयत्न या माहितीसह बाब व्यवस्थापन परिषदेत सादर करावी.** |



SKS

| | |
|---|---|
| | **यापुढे महाविद्यालयाच्या कोणत्याही बाबी व्यवस्थापन परिषदेत सादर करताना महाविद्यालयाकडून कोणतेही शुल्क प्रलंबित नसल्याच्या प्रमाणपत्रासहित व प्राचार्य पदाच्या उपरोक्त नमुद केलेल्या माहितीसह सादर करण्यात यावी, असे ठरले.** |
| | **( संलग्नता व मान्यता विभाग)** |
| **बाब क्र.४** | **सचिव, हॉलिमारिया मिलग्रिज फर्नांडीस चॅरिटेबल ट्रस्ट, कल्याण (प.), ठाणे यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये संलग्नता शुल्क दंडाची रक्कम माफ करण्यासंदर्भात केलेली विनंती व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.** |
| **ठराव** | मे. जाधव व कंपनीच्या अहवालाप्रमाणे संलग्नता व मान्यता विभाग तसेच वित्त व लेखा विभाग यांनी विषयानुरुप सर्व बाबी तपासुन कुलसचिवांच्या मार्फत उच्च स्तरीय समितीपुढे सादर करावी व उच्च स्तरीय समितीच्या अभिप्रायासह बाब पुनश्चः व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावी.<br>चर्चेअंती उच्च स्तरीय समितीने, वित्त विभाग, संलग्नता विभाग व इतर संबधीत विभागासोबत चर्चा करुन संलग्नता शुल्काची रक्कम वसुली बाबत ॲमनेस्टी स्कीम कशी असावी याबाबत अभ्यासकरुन मार्गदर्शक तत्वे तयार करुन व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करावी, असे ठरले. |
| | **( शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि.))** |
| **बाब क्र.५** | **डॉ. जोस जॉर्ज यांनी विद्यापीठात सेवानिवृत्तीनंतर प्रदान केलेल्या सेवांचा मोबदला देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.** |
| **ठराव** | डॉ. जोस जॉर्ज यांनी विद्यापीठात सेवानिवृतीनंतर प्रदान केलेल्या सेवांचा मोबदला देण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ०६/१०/२०१८ बाब क्र. २० वरील निर्णय जोस जॉर्ज यांना पुनश्चः कळवावा व त्यानुसार कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच ही बाब व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करावी. |
| | **(Thesis Department)** |
| **बाब क्र.६** | **Letter dated 19th April, 2018, received from the Principal, Vivekanand Education Society's College of Arts, Science & Commerce, Mumbai, requesting therein to waive the late fees towards payment of fees for their Research Centre for continuation of recognition for M.Sc. (By** |



SKS

| | |
|---|---|
| | **Research) & Ph.D. (Science) in the subject of Chemistry for consideration.** |
| **ठराव** | मे. जाधव व कंपनीच्या अहवालाप्रमाणे प्रबंध विभाग तसेच वित्त व लेखा विभाग यांनी विषयानुरुप सर्व बाबींची शहानिशा करुन कुलसचिवांच्या मार्फत ही बाब व्यवस्थापन परिषदने गठीत केलेल्या उच्च स्तरीय समितीपुढे सादर करावी व उच्च स्तरीय समितीच्या अभिप्रायासह बाब पुनश्च: व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावी. |
| | **(Thesis Department)** |
| **बाब क्र.७** | **Request by the Research Centres to waive the late fees towards Continuation of Recognition for Ph.D. Courses at the respective centers for consideration.** |
| **ठराव** | मे. जाधव व कंपनीच्या अहवालाप्रमाणे प्रबंध विभाग तसेच वित्त व लेखा विभाग यांनी विषयानुरुप सर्व बाबींची शहानिशा करुन कुलसचिवांच्या मार्फत ही बाब व्यवस्थापन परिषदने गठीत केलेल्या उच्च स्तरीय समितीपुढे सादर करावी व उच्च स्तरीय समितीच्या अभिप्रायासह बाब पुनश्च: व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावी. |
| | **( आस्थापना विभाग २/४)** |
| **बाब क्र.८** | **विद्यापीठातील गटविमा योजनेत समाविष्ट न होणा-या शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वैद्यकीय भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |
| **ठराव** | सखोल चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील गटविमा योजनेत समाविष्ट होणा-या कर्मचा-यांनाच योजनेचा लाभ देण्यात यावा व गटविमा योजनेत समाविष्ट न होणा-या शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वैद्यकीय भत्ता देण्यात येउ नये. |
| | **( विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग )** |
| **बाब क्र.९** | **दिनांक २४ जून २०१५, २० जून २०१७, २२ डिसेंबर २०१७, १५ मार्च २०१८, ३१ जुलै २०१८, २४ सप्टेंबर २०१८, ३० ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीचे इतिवृत्त मंजूरीसाठी सादर.** |
| **ठराव** | विषयानुषंगाने चर्चेअंती दिनांक २४ जुन २०१५, दिनांक २० जुन २०१७, २२ |

| | |
|---|---|
| | डिसेंबर २०१७ व १५ मार्च २०१८ रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने तज्ज्ञ समिती गठीत करण्यात यावी. तज्ज्ञ समितीमध्ये BWC मध्ये असलेले आर्किटेक्ट, तज्ज्ञ इंजिनिअर, PWD चे प्रतिनिधी व ॲड. निल हेळेकर यांचा समावेश असावा. तज्ज्ञ समिती इतिवृत्ताच्या अनुषंगाने झालेली प्रक्रिया संबधीत तरतुदीनुसार तपासेल. तद्वतच इमारतींचे बांधकाम नुतनीकरण इत्यादी प्रत्यक्ष पाहणी करुन अहवाल १५ दिवसात शिफारसीसह सादर करेल. तज्ज्ञ समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले. सदर अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावा असा ठराव मंजुर करण्यात आला.<br>तसचे दिनांक ३१ जुलै २०१८, २४ सप्टेंबर २०१८ व ३ ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या इमारत व बांधकाम समितीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले.<br>सदर विषयाचे इतिवृत्त याच सभेत कायम करण्यात आले. |
| | **(University Sports Pavilion)** |
| **बाब क्र.१०** | **Proposal for allotment of Tennis Facility in Mumbai University for consideration.** |
| **ठराव** | या बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संचालक, शारिरीक शिक्षण व क्रिडा यांची लवकरच नियुक्ती करण्यात येईल व १ महिन्यामध्ये क्रिडा व शारिरीक शिक्षण मंडळ गठीत करण्यात येईल. एम. सी. ए. सोबत क्रिकेट मैदानासाठी बैठक आयोजित करण्यात यावी. विद्यापीठाच्या मास्टर प्लानमध्ये स्पोर्ट कॉम्प्लेक्स असावा. क्रिडा व शारिरीक शिक्षण मंडळाने प्रथम विद्यापीठाची स्पोर्टस पॉलिसी व ५ वर्षाचा रोड मॅप तयार करावा व क्रिडा महाविद्यालयीन स्तरावरील खेळाबाबत श्री. प्रदिप सावंत व श्री. राजन कोळंबेकर यांनी विद्यार्थ्यांची गरज, खेळाविषयी अभ्यासक्रम इत्यादीबाबत माहिती द्यावी व त्यांच्या इतरही काही सुचना असल्यास लवकरच लेखी स्वरुपात द्याव्यात, असे ठरले. |

| | |
|---|---|
| | AITA संबंधी प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्यास त्याच्या सविस्तर माहितीसह तसेच यासदंर्भात मा. राज्यमंत्री, श्री. रविंद्रजी वायकर उच्च व तंत्रशिक्षण, यांच्या सोबत झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तासह सदर बाब प्रथम क्रिडा व शारीरिक शिक्षण मंडळापुढे ठेवण्यात यावी मंडळाच्या शिफारशी नंतर व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी. यापुढे क्रिडा विषयक सर्व प्रकरणे/प्रस्ताव क्रिडा व शरिरीक शिक्षण मंडळापुढे सादर करावे व नंतर व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावेत. |
| | **(संलग्नता व मान्यता विभाग)** |
| **बाब क्र.११** | **महाविद्यालयाच्या नावात बदल/पत्यात बदल/स्थलांतरण करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे सादर करणे बाबत.** |
| **ठराव** | महाविद्यालयाच्या नावात बदल/पत्यात बदल/स्थलांतर करण्यासाठीच्या मार्गदर्शक तत्वांवर सुचविलेल्या सुचनांनुसार सदर बाब पुन:श्च व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला. |
| | **(Department of Students' Development)** |
| **बाब क्र.१२** | **To Constitute Advisory Committee to guide the Director, Student's Development (DSD) regarduing conducting Students Council Election under Statues provided by the** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ३९३, ३९४, ३९५ व ३९६ **(i) formation of University Department Students' Council, (ii) formation of Institute//College Students' Council and (iii) formation of University Students' Council.** |
| **ठराव** | संचालक, विद्यार्थी विकास विभाग यांना विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ३९३, ३९४, ३९५ व ३९६) परिनियम व आदेशाप्रमाणे घेण्याकरिता विद्यापीठ विभाग स्तरावरिल विद्यार्थी परिषद, महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थेतील विद्यार्थी परिषद तसेच विद्यापीठ विद्यार्थी परिषद गठीत करण्याकरिता मार्गदर्शन करण्याकरिता सल्लागार समिती गठित करण्यात यावी व सल्लागार समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले.<br>सदर ठराव व्यवस्थापन परिषदेच्या याच सभेत कायम करण्यात आला. |

| | |
|---|---|
| बाब क्र.१३ | **( Department of Students' Development)**<br><br>**Permission to –**<br>**1. Note the Uniform Statute** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६७ **relation to the functional mechanism of working of Students' Grievance Redressal Cell**<br>**2. The Director, Students' Development to complete the appropriate actions as per said statutes**<br>**3. To use expenses of working of the Students' Grievance Redressal Cell under the Budget Head: GENERAL ADMINISTRATION 23. MISCELLANEOUS: 1) Hospitality for the Academic Year 2019-20 and create new budget head for the Academic Year 2020-21 under Department of Students' Development**<br>**4. Sanction 2 Junior Clerks for day to day working of the Cell.** |
| ठराव | १) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६७ नुसार २०१९ चा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम क्रमांक ५ (विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाची कार्यकारी यंत्रणा) एकरुप परिनियम २०१९ ची नोंद घेण्यात आली.<br>२) या परिनियमानुसार उचित कार्यवाही पुर्ण करण्याचे अधिकार संचालक, विद्यार्थी विकास यांना देण्यात आले.<br>३) विद्यार्थी तक्रार निवारण कक्षा अंतर्गत होणारा खर्च शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता अर्थसंक्लपीय शिर्षक सर्वसाधारण निधी, २३ संकिर्ण, (१) आतिथ्य, अंर्तगत करण्यात यावा व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता विद्यार्थी विकास विभागाकरिता स्वतंत्र तरतुद करण्यात यावी असे ठरले.<br>४) दोन हंगामी लिपिकांची पदे दैनंदिन कामकाज करण्याकरिता मंजुर करण्यात आली. |
| बाब क्र.१४ | **( Department of Students' Development)**<br><br>**Permission to –**<br>**1. To accept online attestation fees of Rs.1500/- from students applying within India**<br>**2. To accept Online Attestation Fees of $150 from students applying from abroad**<br>3. **To invite e-tender for Online Attestation System** |



SKS

| | |
|---|---|
| **ठराव** | **प्रो. वैभव नरवडे व संचालक, विद्यार्थी विकास यांनी ऑनलाईन सांक्षाकन करण्याबाबत इतर विद्यापीठातील पध्दतीचा तसेच ऑनलाईन सांक्षाकनांबाबत ई-निविदा प्रसिध्द करण्याबाबत अभ्यास करुन त्यांचा अहवाल पुढील व्यवस्थापन परिषदेत सादर करावा.** |
| | **(संलग्नता व मान्यता विभाग)** |
| **बाब क्र.१५** | **शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नविन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र प्राप्त केलेल्या संस्थेच्या अंतिम मान्यतेसाठी तज्ज्ञ समितींचा अहवाल प्राप्त झालेले प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.** |
| **ठराव** | अधिष्ठता मंडळाने दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजी शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नविन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र प्राप्त केलेल्या संस्थेच्या अंतिम मान्यता मिळालेल्या २२ संस्थापैकी १ संस्था वगळता उर्वरीत २१ संस्थेचे प्रस्ताव सकारात्मक शिफारसीसह मा. कुलगुरुंना सादर करण्यात आले. मा. कुलगुरुंनी संबधीत १ संस्थेला सुनावणी करिता आमंत्रित केले. तज्ज्ञ समितीचा अहवाल स्विकारुन २१ महाविद्यालयांचे प्रस्ताव 'परिशिष्ट-अ' प्रमाणे शासनाकडे शिफारसीत करण्याचा ठराव एकमताने पारित करण्यात आला.<br>चर्चेच्या अनुषंगाने महाविद्यालयात जाणा-या स्थानिक चौकशी समितीने त्यांच्या अहवालामध्ये सदर चर्चेच्या अनुषंगाने महाविद्यालयाचे विद्यापीठाकडे कोणतेही शुल्क प्रलंबित नसल्याचे तपासावे व त्याप्रमाणे अहवालामध्ये त्याचा उल्लेख करावा, तसेच महाविद्यालयात प्रथम संलग्नीकरण करण्याकरिता जाणा-या समितीने त्या संस्थेची इतर महाविद्यालये असल्यास त्या महाविद्यालयासंदर्भात देखील प्रलंबित शुल्काची तपासणी करुन स्थानिक चौकशी समितीच्या अहवालामध्ये त्यांचा स्पष्ट अभिप्राय द्यावा. संलग्नता विभागाने या संदर्भात स्थानिक चौकशी समितींना सुचित करावे व त्याअनुषंगाने स्थानिक चौकशी समिती अहवालाच्या नमुन्यात बदल करुन घ्यावा. |

| | |
|---|---|
| | यावर्षी मान्यता मिळालेल्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन सुरु होणा-या महाविद्यालयांचे सर्व संलग्नता शुल्क विद्यापीठास प्राप्त आहेत व सदर महाविद्यालयाचे कोणतेही शुल्क प्रलंबित नसल्याबाबतची माहिती व्यवस्थापन परिषदेस देण्यात यावी. अनु क्र. ११ बिर्ला महाविद्यालया संदर्भात मा. सदस्य श्री. मुकादम यांनी त्यांचा आक्षेप नोंदविला. |
| बाब क्र.१६<br><br>ठराव | **(मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था)**<br>**The GR regarding the Research Project on "Policy Formulation for Particularly Vulnerable Tribal Groups" (PVTG) for information, ratification and adoption.**<br>सन २०१८-१९ करिता आदिम जमाती विकास योजने अंतर्गत "Policy Formulation for Particularly Vulnerable Tribal Groups" (PVTG) based on field research and need assessment- Tribal Research Center Mumbai School of Economics & Publc Policy" या योजनांच्या मार्गदर्शक तत्वांना मंजुरी देण्याबाबत शासन निर्णय क्र. आदिम. २०१८/प्र.क्र.१२६/का-१९ दिनांक २९/०१/२०१९ ची नोंद घेउन स्विकारण्यात आला. |
| बाब क्र.१७<br><br>ठराव | **(मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था)**<br>**The GR regarding the Research Project on "Building social capital through training and nurturing 60 youth leaders (Gram saathis) 20 each from 3 PVTG communities" for information, ratification and adoption.**<br>सन २०१८-१९ करिता आदिम जमाती विकास योजनेअंतर्गत "महाराष्ट्रातील आदिम जमाती (मिडीया, कोलम, कातकरी) समुहाच्या समावेशक विकासासाठी ६० ग्रामस्थांची नियुक्ती, प्रशिक्षण कार्यक्रम" या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजुरी देणेबाबतचा शासन निर्णय क्र.केंद्रीय-२०१८/प्र.क्र.१५४/का-१९ दिनांक २९/१/२०१९ ची नोंद घेऊन स्विकारण्यात आला. |



SKS

| | |
|---|---|
| | **(विद्यापीठ क्रिडा संकुल)** |
| बाब क्र.१८ * | **Proposal for Basketball coaching at Mumbai University premises (Kalina)** |
| ठराव | या बाबत ~~प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्यास~~ त्याच्या सविस्तर माहितीसह सदर बाब प्रथम क्रिडा व शारीरिक शिक्षण मंडळापुढे ठेवण्यात यावी व मंडळाच्या शिफारशीसह व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये सादर करण्यात यावी. |
| | **(विद्याविषयक प्राधिकरणे विभाग)** |
| बाब क्र.१९ | **विद्वत परिषदेच्या दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजीच्या सभेमध्ये अनुक्रमे बाब क्रमांक ४.९, ४.१०, ४.११, ४.१५, ४.२०, ४.२१, ४.२२, ४.३०, ४.३१, ४.३२, ४.३५, ४.३७, ४.३८, ४.५४, ५.१, ५.२ व ८.१ अन्वये पारित केलेले ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.** |
| ठराव | विद्वत परिषदेच्या दिनांक १५ एप्रिल २०१९ रोजीच्या सभेमध्ये अनुक्रमे बाब क्रमांक ४.९, ४.१०, ४.११, ४.१५, ४.२०, ४.२१, ४.२२, ४.३०, ४.३१, ४.३२, ४.३५, ४.३७, ४.३८, ४.५४, ५.१, ५.२ व ८.१ अन्वये पारित केलेले ठराव मान्य करण्यात आले.<br>बाब क्र.४.३५ वरील चर्चेच्या अनुषंगाने स्वायत्त महाविद्यालयांकडून सलग्नता शुल्क (One Time Affiliation Fee) प्राप्त झाल्यासंबधीत माहिती व्यवस्थापन परिषदेत देण्यात यावी, असे ठरले. तसेच सर्व स्वायत महाविद्यालयांना त्यांचे मार्फत संचालित होत असलेल्या परिक्षांविषयी विद्यापीठाला कळविण्याबाबत सुचना देण्यात याव्यात. |
| | **(प्रबंध विभाग)** |
| बाब क्र.२० | **Remuneration to be paid to Paper (Item) setters / Chairman / Moderators / Principal / IT Co-ordinators /Lab Assts. / College exam centers for infrastructure for conducting first online PET 2018 on 23/12/2018.** |
| ठराव | ऑनलाईन पेट परिक्षा २०१८ करिता योगदान दिलेल्या पेपर सेंटर/अध्यक्ष/मॉडरेटर/प्राचार्य/आय.टी समन्वयक/लॅब असिस्टंट/ऑनलाईन |

* दिनांक १ जुन, २०१९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत बाब क्र.२ नुसार व्य.प. दिनांक २६ एप्रिल, १९ मधील बाब क्र.१८ च्या ठरावात पुढील दुरूस्ती केली.



बाब क्र. १८ चा ठराव (सुधारित) ⇒ या बाबत सविस्तर माहितीसह सदर बाब प्रथम क्रिडा व शारीरिक शिक्षण मंडळापुढे ठेवण्यात यावी व मंडळाच्या शिफारशीसह व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये सादर करण्यात यावी.

| | |
|---|---|
| | पेट/परिक्षा २०१८ दिनांक २३ डिसेंबर २०१८ रोजी घेण्याकरिता ज्या महाविद्यालयांच्या परिक्षा केंद्रानी पायाभुत सुविधा पुरविल्या त्यांना 'परिशिष्ट-ब' १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मोबदला देण्यास मान्यता देण्यात आली. |
| | **( Mumbai School of Economics and Public Policy )** |
| बाब क्र.२१ | **Submitting Addendum to Quant Roboanalytics Solutions (QRS) Private Limited Mou for approval.** |
| ** ठराव | ~~The item is deferred.~~ It was resolved that the Addendum of MOU between University of Mumbai's Mumbai School of Economics and Public Policy and Quant Roboanalytics Solutions (QRS) Private Limited is approved. |
| | **(विद्यापीठ क्रिडा संकुल)** |
| बाब क्र.२२ | **Proposal for starting the Rhythmic Gymnastics activity.** |
| ** ठराव | प्रिमिअर रिधमिक जिमनॅस्टिक ॲकॅडमी यांचेकडून दिनांक ८/४/२०१९ अन्वये रिधमिक जिमनॅस्टिक मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात कल्चरल सेंटरच्या हॉलमध्ये सुरू करण्यास प्राप्त झालेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली व प्रस्तावाच्या अनुषंगाने ११ महिन्याचा करार करण्यात यावा, असे ठरले. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्री. दिपकुमार मुकादम व कुलसचिव यांनी एकत्रित चर्चा करुन सदर करार प्रारुप तयार करणे व स्वाक्षरी करुन त्यासंदर्भात अंमलबजावणी करण्याचे अधिकार कुलसचिवांना देण्यात आले. श्री प्रदिप सावंत व श्री राजन कोळंबेकर यांनी सदर ठरावास आक्षेप नोंदविला. सदर ठराव व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्येच कायम करण्यात आला. |
| | **( क्षेत्र विकास विभाग )** |
| बाब क्र.२३ | **Request for allotment of 0.5 acres of land in Kalina Campus, University of Mumbai to AICTE, Western Regional Office.** |
| ठराव | ए.आय.सी.टी.ई. कडून ०.५ एकर जागा विद्यापीठाच्या कलिना परिसरात |

** दिनांक 9 जुन, 2019 रोजी आलेल्या व्य.प. बैठकीत बाब क्र.2 नुसार व्य.परिषद दिनांक 26 एप्रिल, 2019 मधील इतिवृत्ताच्या बाब क्र. 21 व 22 मध्ये दुरुस्ती करण्यात आली.



SKS

| | |
|---|---|
| | देण्याबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली.<br>विद्यापीठात एम.एम.आर.डी.ऐ. ला मास्टर प्लान संदर्भात जागा दिलेली आहे व त्यांची योग्य त–हेने अंमलबजावणी करणे आवश्यक असताना या परिस्थितीत ए. आय.सी.टी.ई. ला विद्यापीठाच्या कलिना परिसरात जागा देणे शक्य होणार नाही, असे ठरले; परंतु ए.आय.सी.टी.ई. ला विद्यापीठ ठाणे उपपरिसर अथवा स्कुल ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड अप्लाईड सायन्स, कल्याण येथे जागा उपलब्ध होईल की, कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरले. |
| | **अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेले विषय** |
| <br><br>**बाब क्र.२४**<br><br><br><br><br><br>**ठराव** | **(अवैध साधन सामग्री कक्ष, परीक्षा विभाग)**<br>**दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेतील बाब क. ६ डॉ. पंतगराव कदम कला व वाणिज्य महाविद्यालय, पेण जि. रायगड या महाविद्यालयाबाबत विद्यार्थी श्री. तन्मय हरिचंद्र पाटील यांच्या दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजीचा तक्रार अर्जा संदर्भात गठीत केलेल्या डॉ. एम. एस. कुऱ्हाडे व इतर यांच्या समितीचा अहवालाबाबत परीक्षा व मुल्यमापन मंडळाने केलेली कार्यवाही माहितीस्तव सादर.**<br>दिनांक २५ एप्रिल २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेतील बाब क. ६ डॉ. पंतगराव कदम कला व वाणिज्य महाविद्यालय, पेण जि. रायगड या महाविद्यालयाबाबत विद्यार्थी श्री. तन्मय हरिचंद्र पाटील यांच्या दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजीचा तक्रार अर्जा संदर्भात गठीत केलेल्या डॉ. एम. एस. कुऱ्हाडे व इतर यांच्या समितीचा अहवालाबाबत परीक्षा व मुल्यमापन मंडळाने केलेली कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
| <br><br>**बाब क्र.२५** | **(आस्थापना १ व ३ विभाग)**<br>**शासनाने मुंबई विद्यापीठासाठी मंजूर केलेल्या 'विद्याशाखा अधिष्ठाता' (०४) पदे व संचालक, विद्यार्थी विकास या पदांकरीता ०५ वाहन चालक व ०२** |



SKS

| | |
|---|---|
| | **अतिरिक्त वाहन चालक अशी एकूण ०७ पदे हंगामी स्वरुपात निर्माण करण्याबाबत.** |
| **ठराव** | चर्चेअंती मुंबई विद्यापीठासाठी मंजूर केलेल्या 'विद्याशाखा अधिष्ठाता' (०४) पदे व संचालक, विद्यार्थी विकास या पदांकरीता प्रथम वाहन खरेदी करण्यात यावे व नंतर वाहन चालक नेमण्यासंदर्भातील बाब व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर करण्यात यावी असे निर्देश परिषदेने दिले. |
| | **(वित्त व लेखा विभाग)** |
| **बाब क्र.२६** | **वित्त व लेखा समितीने दिनांक ०९ एप्रिल, २०१९ च्या सभेत केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेस सादर.** |
| **ठराव** | वित्त व लेखा समितीने दिनांक ०९ एप्रिल, २०१९ च्या सभेत केलेल्या शिफारशी मंजुर करण्यात आल्या. |
| | **( शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (विशि))** |
| **बाब क्र.२७** | **मुंबई विद्यापीठातील मंजूर शिक्षकीय पदांपैकी कोणत्याही दोन विभागातील दोन सहायक प्राध्यपकांची रिक्त पदे विद्याशाखा अधिष्ठातांकरीता दर्जोन्नत करण्याबाबत.** |
| **ठराव** | मुंबई विद्यापीठ विद्यापीठातील मंजूर शिक्षकीय पदांपैकी सादर केलेल्या सुचितील योग्य त्या दोन विभागातील दोन सहायक प्राध्यपकांची रिक्त पदे विद्याशाखा अधिष्ठातांकरीता व्यपगत करण्याबाबत प्र-कुलगुरुंना संबंधीत विभाग प्रमुखांशी चर्चा करुन निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. |
| | **(विद्यापीठ अभियंता विभाग)** |
| **बाब क्र.२८** | **Approval of an Estimate Amounting of Rs.42,59,626/- plus GST for structural repair of PVC Lodge at Marine Lines.** |



SK

| | |
|---|---|
| ठराव | प्र-कुलगुरुंचे मरिन लाईन्स येथील निवासस्थानाचे स्ट्रक्चरल दुरुस्ती करण्याकरिता रु.४२,५९,६२६ + जी.एस.टी या रक्कमेच्या अंतदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. तसेच या कामाकरीता लागणारा कालावधी पाहता बांधकाम खर्चामध्ये होणारी संभावित वाढ लक्षात घेता सुचविलेल्या अंदाजित खर्चाच्या १०% अधिक रक्कमेस मान्यता देण्यात आली.<br>चर्चेच्या अनुषंगाने क्षेत्र विकास विभागातील कामकाजाचा वाढणारा भार लक्षात घेता सेवानिवृत्त अभियंता/अनुभवी तांत्रिक सल्लागाराची हंगामी तत्वावर नेमणुक करण्यात यावी व सदर कामे विहित कालावधीत पुर्ण करण्यात यावीत. सदर तांत्रिक सल्लागार ची रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार) प्रति महिना मानधनावर हंगामी तत्वावर प्रथम ११ महिन्याकरीता नियुक्ती करावी. तसेच त्यांच्या निवासाची व्यवस्था विद्यापीठातर्फे करण्यात यावी. विद्यापीठाच्या कलिना परिसरातील २४० एकर परिसराचा व विद्यापीठाच्या विविध उपपरिसरांचा विचार करता सदर तांत्रिक सल्लागारांना विद्यापीठातर्फे आवश्यकतेनुसार वाहन उपलब्ध करुन देण्यात यावे, असे ठरले. सदर नेमणुक करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यापीठातील अतिथी गृह व वसतीगृह सर्व सुरु करण्यात यावे व यासाठी प्राचार्य डॉ. अजय भामरे व ॲड. निल हेळेकर यांनी या संबधात सनियंत्रण करण्याबाबत मा. कुलगुरुंच्या विनंतीला मान देवून जबाबदारी स्विकारली.<br>सदर ठराव व्यवस्थापन परिषदेच्या याच सभेमध्ये कायम करण्यात आला. |

SKS

| | **( Department of Students' Development)** |
|---|---|
| **बाब क्र.२९** | **Permission to –**<br>Approve the Guidelines of Students' Griveance Redressal Cell under the Uniform Statue महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमाक ६७, dated 27th February, 2019 for :<br>i. Guidelines of Department Grievance Redressal Cell (UGRC)<br>ii. Giuelines of College Grievance Redressal Cell (CGRC)<br>iii. Guidelines of Institutional Grivance Redressal Cell (CGRC)<br>iv. Guidelines of University Grievance Redressal Cell (UGRC)<br>v. Ombudsperson for Students' Grivance Redressal |
| **ठराव** | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६७ दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ अन्वये प्रसिद्ध झालेल्या एकरुप परिनियम क्र. ५ च्या अंमलबजावणीकरिता मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी मा. कुलगुरुंनी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीने विद्यापीठ व महाविद्यालय मान्यताप्राप्त संस्था स्तरावरील खालिलप्रमाणे नमुद केलेल्या विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष व लोकपालकरिता केलेल्या शिफारीशी मान्य करण्यात आल्या.<br>१. विभाग स्तरावरील तक्रार निवारण कक्ष<br>२. महाविद्यालयीन स्तरावरील तक्रार निवारण कक्ष<br>३. मान्यताप्राप्त संस्था स्तरावरील तक्रार निवारण कक्ष<br>४. विद्यापीठ स्तरावरील तक्रार निवारण कक्ष<br>५. विद्यार्थी तक्रारण निवारण लोकपालसाठी |

**चर्चेच्या अनुषंगाने खलिल ठराव पारित झाले.**

प्राधिकरणांच्या सभांचे कामकाज संगणक प्रणालीद्वारे (E- Governance) होण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन परिषदेपासुन सुरुवात करावी असे ठरले. त्याअनुषंगाने मार्गदर्शक तत्वे तयार करण्याकरिता मा. प्र-कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. समितीमध्ये प्रो. बी. एन. जगताप व डॉ. वैभव नरवडे यांचा सन्माननिय सदस्य म्हणुन समावेश राहिल, असे ठरले. समितीने आपला अहवाल यथाशिघ्र सादर करावा म्हणजे या संदर्भातील कार्यवाही तातडीने करता येईल, असे मत परिषदेने व्यक्त केले.

कुलसचिवांनी उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

SKSawant
सहायक कुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

इतिवृत्त मंजूर

कुलगुरू

26|4|19
बाब क्र ९५
(परिशिष्ट-अ)

# शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी नविन महाविद्यालय पदवी पुर्व सुरू करण्यासाठी अंतिम मान्यतेसाठी विद्यापीठास प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा तपशिल

| अ. क्र. | फाईल नं. | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित महाविद्यालयाचे नाव व ठिकाण | बृहत आराखडा जिल्हा/ ठिकाण | बृहत आराखडातील बिंदू | प्रस्तावित महाविद्यालयासाठी मागितलेले अभ्यासक्रम | छाननी समितीचे अभिप्राय (दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९) | विभागाचे अभिप्राय | तज्ज्ञ समितीचा अभिप्राय | अधिष्ठाता मंडळाची दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजीच्या बैठकिचा अहवाल | मा. कुलगुरूंचे निर्णय (पात्र/ अपात्र) दिनांक १५ एप्रिल, २०१९ | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २६ एप्रिल, २०१९ रोजीच्या बैठकिचा अहवाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | O-०२ ENW 54728 | वसंतदादा पाटील प्रतिष्ठान वसंतदादा पाटील एज्यूकेशनल कॉम्प्लेक्स, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, शिवडी वडाळा चेंबूर रोड, सायन, मुंबई- ४०० ०२२ | वसंतदादा पाटील प्रतिष्ठानचे लॉ कॉलेज वसंतदादा पाटील एज्यूकेशनल कॉम्प्लेक्स, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, शिवडी वडाळा चेंबूर रोड, सायन, मुंबई- ४०० ०२२ | मुंबई शहर | विधी महाविद्यालय | विधी (३ वर्ष) (०-६०) | अ. क्र. ९, १०, १२, १३, १५ आणि १८ ची पुर्तता केलेली नाही | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| २ | O-०४ ENW 38695 | भारतीय ग्रामीण पुर्नरचना संस्था जे. के. नॉलेज स्वामी सेवेन हिल्स कोपोरेशन, जालना रोड, औरंगाबाद-४३१००५ | जे. के. जाधव कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स नाईट कॉलेज जे. के. नॉलेज सेंटर, नाडकर्णी पार्क, बीपीटी हॉस्पिटल जवळ, वडाळा (पू), मुंबई-४०० ०३७ | वडाळा | रात्र महाविद्यालय (कला, वाणिज्य, विज्ञान) (पदवीपूर्व) | बी. ए. (०-१२०)<br>बी. कॉम (०-१२०)<br>बी. एस्सी (०-१२०) | अ. क्र. ७.२, ९, १०, १४ आणि १७ ची पुर्तता केलेली नाही | संस्थेच्या अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयाचे नॅक नाही | परवानगी देणे संयुक्तिक होणार नाही | अपात्र | अपात्र | अपात्र |
| ३ | O-१२ ENW 62345 | कला विद्यालय ट्रस्ट प्लॉट क्रमांक एम ३ आर एस सी १९ म्हाडा वर्ल्ड बँक प्रोजेक्ट, गायकवाड नगर, माल्वाड (प). मुंबई- ४०० ०९५ | कला विद्यालयाचे रात्र महाविद्यालय ऑफ आर्टस, सायन्स आणि कॉमर्स प्लॉट क्रमांक एम ३ आर एस सी १९ म्हाडा वर्ल्ड बँक प्रोजेक्ट गायकवाड नगर, माल्वाड (प), मुंबई- ४०० ०९५ | माल्वाड | रात्र महाविद्यालय (कला, वाणिज्य, विज्ञान) (पदवीपूर्व) | बी. ए. (०-१२०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| ४ | O-१७ ENW [illegible] | विद्या प्रसारक संस्था [illegible] | विद्या प्रसारक संस्थेचे [illegible] | [illegible] | कला, वाणिज्य व विज्ञान [illegible] | [illegible] | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |

Pc.5 Reg.17.ros. She. New / Kelkar/ 2019-20/Opening 19-20/ Proposed Final Opening Coll 19-20/ (Pra)

| अ. क्र. | फाईल नं. | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित महाविद्यालयाचे नाव व ठिकाण | बृहत आराखडा जिल्हा/ ठिकाण | बृहत आराखडातील बिंदू | प्रस्तावित महाविद्यालयासाठी मागितलेले अभ्यासक्रम | छाननी समितीचे अभिप्राय (दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९) | विभागाचे अभिप्राय | तज्ञ समितीचा अभिप्राय | अधिष्ठाता मंडळाची दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजीच्या बैठकिचा अहवाल | मा. कुलगुरूंचे निर्णय (पात्र/ अपात्र) दिनांक १५ एप्रिल, २०१९ | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २६ एप्रिल, २०१९ रोजीच्या बैठकिचा अहवाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| ५ | ०-२० ENW 95623 | जीवनदीप शैक्षणिक संस्था मु. पोई, पोस्ट वाहोली, तालुका कल्याण, जि. ठाणे-४२१ ३०१ | जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मु. म्हसा, ता. मुरबाड, जि. ठाणे-४२१ ४०१ | मुरबाड जि. ठाणे | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय | बी. ए. (०-१२०)<br>बी. कॉम (०-१२०)<br>बी. एस्सी (०-१२०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| ६ | ०-२४ ENW 83642 | ज्ञानवर्धिनी एज्यूकेशन सोसायटी मिरा भाईदर, जि. ठाणे-४०१ १०४ | मुंबई कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मिरा रोड, भाईदर, जि. ठाणे-४०१ १०४ | मिरा भाईदर जि. ठाणे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (पदवीपूर्व) | बी. एस्सी (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) (०-६०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| ७ | ०-२७ ENW 73896 | अॅड. भगवान केणी चॅरीटेबल ट्रस्ट मंगलमुर्ती बंगला न्यु कळवा हायस्कुल च्या मागे, मारूती नगर, कळवा, जि. ठाणे-४०० ६०५ | जय भगवान कॉलेज ऑफ लॉ सुर्या नगर, ठाणे-बेलापूर रोड, जकात नाक्या जवळ, विटावा, कळवा, जि. ठाणे-४०० ६०५ | विटावा जि ठाणे | विधी महाविद्यालय | विधी (३ वर्ष) (०-६०)<br>विधी (५ वर्ष) (०-६०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| ८ | ०-२५ ENW 82369 | पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ विद्याश्रम, धामाणकर नाका, भिवंडी, जि. ठाणे-४२१ ३०५ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय बी. एन. एन. महाविद्यालय परिसर, विद्याश्रम, धामाणकर नाका, भिवंडी, जि. ठाणे-४२१ ३०५ | भिवंडी जि. ठाणे | विधी महाविद्यालय | विधी (३ वर्ष) (०-६०)<br>विधी (५ वर्ष) (०-६०) | अ. क्र. ४, ९, आणि १० ची पुर्तता केलेली नाही | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| ९ | ०-२८ ENW 76825 | टि. एस. पी. मंडळ दीपकृष्ण आपार्टमेंट, दुर्गा माता रोड, काटेमानिवली, कल्याण (पू). जि. ठाणे-४२१ ३०६ | मॉडेल कॉलेज ऑफ लॉ टिटवाळा, ता. कल्याण, जि. ठाणे-४२१ ६०५ | कल्याण जि. ठाणे | विधी महाविद्यालय | विधी (३ वर्ष) (०-६०)<br>विधी (५ वर्ष) (०-६०) | अ. क्र. ६ ते १३ आणि १८ ची पुर्तता केलेली नाही | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| १० | ०-३१ ENW 28435 | तुलसी शिक्षण प्रसारक मंडळ दीपकृष्ण आपार्टमेंट, दुर्गा माता रोड, काटेमानिवली, कल्याण (पू). जि. ठाणे [illegible] | उज्वल मर्डेट कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स, [illegible] | [illegible] जि. ठाणे | सत्र महाविद्यालय (कला, [illegible]) | बी. ए. (०-१२०)<br>बी. कॉम (०-१२०) | अ. क्र. ७ ची पुर्तता केलेली नाही | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |

Pc.5 Reg.17.ros. She. New. / Kelkar/ 2019-20/Opening 19-20/ Proposed Final Opening Coll 19-20/ (Pra)

| अ. क्र. | फाईल नं. | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित महाविद्यालयाचे नाव व ठिकाण | बृहत आराखडा जिल्हा/ ठिकाण | बृहत आराखडातील बिंदू | प्रस्तावित महाविद्यालयासाठी मागितलेले अभ्यासक्रम | छाननी समितीचे अभिप्राय (दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९) | विभागाचे अभिप्राय | तज्ज्ञ समितीचा अभिप्राय | अधिष्ठाता मंडळाची दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजीच्या बैठकिचा अहवाल | मा. कुलगुरूंचे निर्णय (पात्र/ अपात्र) दिनांक १५ एप्रिल, २०१९ | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २६ एप्रिल, २०१९ रोजीच्या बैठकिचा अहवाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| ११ | O-३६ ENW 28576 | कल्याण सिटीझन्स एज्यूकेशन सोसायटी, द्वारा बी. के. बिर्ला कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बी. के. बिर्ला महाविद्यालय रोड, कल्याण (प), जि. ठाणे-४२१ ३०४ | बी. के. बिर्ला रात्रकालीन कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बी. के. बिर्ला महाविद्यालय रोड, कल्याण (प), जि. ठाणे-४२१ ३०४ | कल्याण (पश्चिम) जि. ठाणे | रात्र महाविद्यालय (कला, वाणिज्य, विज्ञान) (पदवीपूर्व) | बी. ए. (०-१२०)<br>बी. कॉम (०-१२०)<br>बी. एस्सी (०-१२०) | अ. क्र. १० ची पुर्तता केलेली नाही | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| १२ | O-३५ ENW 45728 | शिवाई विद्या प्रसारक मंडळ शिवाई नगर, पोखरण रोड नं. १, ठाणे (प), जि. ठाणे-४०० ६०६ | शिवाई कला विज्ञान आणि वाणिज्य रात्र महाविद्यालय शिवाई नगर, पोखरण रोड नंबर १, ठाणे (प), जि. ठाणे-४०० ६०६ | ठाणे जि. ठाणे | रात्र महाविद्यालय (कला, वाणिज्य, विज्ञान) (पदवीपूर्व) | बी. कॉम (०-१२०)<br>बी. कॉम (अकांऊटींग अॅन्ड फायन्यास) (०-६०)<br>बी. एम. एस. (०-६०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| १३ | O-४३ ENW 72384 | अभिनव ज्ञान मंदिर संस्था कर्जत, जि. रायगड-४१० २०१ | अभिनव ज्ञान मंदिर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय कर्जत, जि. रायगड-४१० २०१ | कर्जत डोंगराळ भाग जि. रायगड | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (पदवीपूर्व) | बी. ए. (०-१२०)<br>बी. कॉम (०-१२०)<br>बी. एस्सी (०-१२०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| १४ | O-४५ ENW 79465 | माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ कचेरी रोड, ता. माणगाव, जि. रायगड-४०२ १०४ | अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय मु. जुने माणगाव, जिल्हा सत्र न्यायालय शेजारी, ता. माणगाव, जि-रायगड-४०२ १०४ | महाड ते माणगांव जि-रायगड | विधी महाविद्यालय | विधी (३ वर्ष) (०-६०) | अ. क्र. ९, १० आणि १७ ची पुर्तता केलेली नाही | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| १५ | O-४७ ENW 18976 | हिरकणी एज्युकेशन ट्रस्ट [illegible] | हिरकणी रात्र महाविद्यालय [illegible] | महाड जि. रायगड | रात्र महाविद्यालय [illegible] | बी. ए. (०-१२०) [illegible] | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |

| अ. क्र. | फाईल नं. | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित महाविद्यालयाचे नाव व ठिकाण | बृहत आराखडा जिल्हा/ ठिकाण | बृहत आराखडातील बिंदू | प्रस्तावित महाविद्यालयासाठी मागितलेले अभ्यासक्रम | छाननी समितीचे अभिप्राय (दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९) | विभागाचे अभिप्राय | तज्ज्ञ समितीचा अभिप्राय | अधिष्ठाता मंडळाची दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजीच्या बैठकिचा अहवाल | मा. कुलगुरूंचे निर्णय (पात्र/ अपात्र) दिनांक १५ एप्रिल, २०१९ | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २६ एप्रिल, २०१९ रोजीच्या बैठकिचा अहवाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १६ | O-५० ENW 34972 | हिरवळ एज्यूकेशन ट्रस्ट एच नं १९१३, अनंत कॉम्प्लेक्स, शॉप नं. २, एम. जी. रोड, पोस्ट, महाड, जि. रायगड-४०२ ३०१ | राजमाता जिजाऊ महिला विद्यालय ग्रीनलँड आपार्टमेंट नवेनगर, महाड तालूका पोलिस स्टेशन समोर, महाड, जि. रायगड- ४०२ ३०१ | महाड, जि. रायगड | महिला महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान ) | बी. ए. (०-१२०)<br>बी. कॉम (०-१२०)<br>बी. एस्सी (०-१२०)<br>बी. एस्सी (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) (०-६०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| १७ | O-५२ ENW 49362 | कुणवी शिक्षण प्रसारक मंडळ कुणवी भवन, महाडिक स्टॉप, मु. पो. देवरूख, संगमेश्वर, जि. रत्नागिरी-४१५ ८०४ | मामासाहेब भुवड कॉलेज ऑफ कॉमर्स अँन्ड हॉटेल मॅनेजमेंट देवरूख, संगमेश्वर, जि. रत्नागिरी-४१५ ८०४ | संगमेश्वर जि. रत्नागिरी | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय | बी. कॉम (अकांऊटींग अँन्ड फायन्यास) (०-६०)<br>बी. एस्सी (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) (०-६०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| १८ | O-६३ ENW 56938 | वाडा निर्मिती एज्यूकेशन सोसायटी वाडा परली रोड, हरोसाळे, ता. वाडा, जि. पालघर-४२१ ३०३ | विद्या वारीधी डिग्री कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अँन्ड सायन्स संतोष भुवन, बलाईपाडा रोड, नालासोपारा, ता. वसई, जि. पालघर- ४०१ २०८ | नालासोपारा जि. पालघर | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (पदवीपूर्व) | बी. कॉम (०-१२०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| १९ | O-५६ ENW 68234 | आर पी एज्यूकेशनल ट्रस्ट प्लॉट नं ४४, शास्त्री नगर, गणपती मंदीर, वर्तक पॉलीटेक्नीक कॉलेज जवळ, वसई (प), जि. पालघर- ४०१ २०२ | आर पी इन्स्टिटयुट ऑफ हॉस्पिटॅलिटी अँन्ड मॅनेजमेंट प्लॉट नं ४४, शास्त्री नगर, गणपती मंदीर, वर्तक पॉलीटेक्नीक कॉलेज जवळ, वसई (प), जि. पालघर- ४०१ २०२ | [illegible] | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय | बी. एस्सी (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) (०-६०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |

| अ. क्र. | फाईल नं. | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित महाविद्यालयाचे नाव व ठिकाण | बृहत आराखडा जिल्हा/ ठिकाण | बृहत आराखडातील बिंदू | प्रस्तावित महाविद्यालयासाठी मागितलेले अभ्यासक्रम | छाननी समितीचे अभिप्राय (दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९) | विभागाचे अभिप्राय | तज्ज्ञ समितीचा अभिप्राय | अधिष्ठाता मंडळाची दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजीच्या बैठकिचा अहवाल | मा. कुलगुरूंचे निर्णय (पात्र/ अपात्र) दिनांक १५ एप्रिल, २०१९ | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २६ एप्रिल, २०१९ रोजीच्या बैठकिचा अहवाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| २० | O-६५ ENW 68279 | के. श्री. विष्णू वामन ठाकूर चॅरीटेबल ट्रस्ट ठाकुर निवास, राजे छत्रपती शिवाजी मार्ग, विरार (प.), ता. वसई, जि. पालघर- ४०१ ३०३ | विवा कॉलेज ऑफ लॉ विवा कॉलेज रोड, डी मार्ट जवळ, विरार (प), ता. वसई, जि. पालघर- ४०१ ३०३ | जि. पालघर | विधी महाविद्यालय | विधी (३ वर्ष) (०-६०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| २१ | O-६६ ENW 85429 | आर एन शिक्षण संस्था आर. एन. नगर, आर. एन. रोड, वकनपाडा, शालीमार उद्योगच्या मागे, नालासोपारा (पू), जि. पालघर-४०१ २०९ | रेकॉन व्युमन डिग्री कॉलेज ऑफ कॉमर्स आर. एन. नगर, आर. एन. रोड, वकनपाडा, शालीमार उद्योगच्या मागे, नालासोपारा (पू), जि. पालघर-४०१ २०९ | जि. पालघर | महिला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय | बी. कॉम (०-१२०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |
| २२ | O-५८ ENW 54362 | ज्ञानोदय एज्युकेशन ट्रस्ट कोल्ही चिंचोटी कामण रोड, वसई (पू), ता. वसई, जि. पालघर-४०१ २०८ | ज्ञानोदया डिग्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स गाव कोल्ही चिंचोटी कामण रोड, वसई (पू), ता. वसई, जि. पालघर-४०१ २०८ | वसई जि. पालघर | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (पदवीपूर्व) | बी. कॉम (०-१२०) बी. एस्सी (०-१२०) | सर्व अटींची पुर्तता केलेली आहे | सर्व अटींची पुर्तता केली आहे | सकारात्मक | पात्र | पात्र | पात्र |

परिशिष्ट - ब
26/4/19
बाब क्र
20

# Total Remuneration for PET 2018 to be given (Approx)

Total applications received (General Category) = 3775

Exam application total fee received @ Rs. 1,000/- per application (General Category) = Rs. 37,75,000/-

Total applications received (Reserved Category) = 2393

Exam application total fee received @ Rs. 500/- per application (Reserved Category) = Rs. 11,96,500/-

**Exam application fee received Grand Total = Rs. 49,71,500/-**

Total questions (items) set = 14955

Total remuneration to be given for questions (items) @Rs.20/- per item = **Rs. 2,99,080/-** ............ (A)

Total questions (items) moderated = 15151

Total remuneration to be given for questions (items) moderated @Rs.5/- per item = **Rs. 75,755/-** ............ (B)

Principal's total remuneration @Rs.1000/- (55 exam centers) = Rs. 55,000/- .....(C)

I.T. Co-ordinator's total remuneration @Rs. 500/- per co-ordinator (79 servers) = **Rs. 39,500/-** ........(D)

Peon / Helper total remuneration @Rs. 200/- per Peon / Helper (79 servers) = **Rs. 15,800/-** ....... (E)

Remuneration to exam centers for infrastructure, facilities etc. @Rs.20/- per candidate = **Rs. 1,23,360/-** ...........(F)

**Total remuneration (A+B+C+D+E+F ) Grand total = Rs. 6,08,495/-**